आयुक्तालय, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्र,
नागपूर फोन नं : 0712-2551550/2551541 ई मेल-commmgnregsmah@gmail.com

पत्र क्रमांक : आयुक्तालय/पंचायत/१६४ /2015 दिनांक 29/ 4 /2015

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी

जिल्हा परिषद सातारा

विषय : महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत वैयक्तिक सिंचन विहिरीचे काम मंजूर करणेबाबत

संदर्भ : आपले पत्र क्र मगांराग्रारोहयो/वै.वि/130/2015 दि 20/4/2015

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपले संदर्भिय पत्रान्वये सातारा पंचायत समिती अंतर्गत दोन लाभार्थ्यांना विहीरीचा लाभ देण्यास्तव पुढीलप्रमाणे मान्यता मागविलेली आहे.

दोन्ही प्रकरणांत लाभार्थी हे ज्या गावचे रहिवासी आहे त्या गावाचे जॉब कार्ड धारक देखील आहेत. मात्र, दोन्ही लाभार्थ्यांना विहीरीचे काम त्यांची शेती ज्या ग्रामपंचायतीच्या हद्दीत आहे त्या ग्रामपंचायतीने प्रस्तावित केले आहे. त्यामुळे आपण दोन्ही प्रकरणी लाभार्थी ज्या ग्रामपंचायतीचे रहिवासी आहेत तेथील जॉब कार्ड रद्द करुन त्यांचे लाभ क्षेत्रातील गावामध्ये जॉब कार्ड काढण्याची परवानगी मागविलेली आहे.

सदर परवानगीच्या अनुषंगाने आयुक्तालय स्तरावरुन पुढीलप्रमाणे मार्गदर्शन देण्यात येत आहे.

1)अजर्दार ज्या ग्रामपंचायतीचा रहिवासी आहे त्याच ग्रामपंचायतीला जॉब कार्ड वितरीत करण्याचे अधिकार आहेत. त्यामुळे आपण मागणी केल्याप्रमाणे लाभार्थी यांना त्यांचे लाभ क्षेत्रातील गावामध्ये जॉब कार्ड काढण्याची परवानगी देता येणार नाही.

2)मात्र, सदर प्रकरणी लाभार्थी ज्या ग्रामपंचायती क्षेत्रातील रहिवासी आहेत, त्या ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेने (लाभार्थ्याची शेती लाभार्थी रहिवासी नसनेल्या इतर ग्रामपंचायतीच्या क्षेत्रात असली तरी देखील) सिंचन विहिरीचा लाभ देण्याची शिफारीस केल्यास दि 17/12/2012 च्या शासन निर्णयाप्रमाणे सदर लाभार्थ्यांच्या सिंचन विहिरींची कामे प्रशासकीय मान्यतेसाठी विचाराधीन ठरु शकतात.

आयुक्त

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार

हमी योजना - महाराष्ट्र, नागपूर

प्रतिलिपी : (1) उपायुक्त (रोहयो) (सर्व) यांना माहितीस्तव

(2) उपजिल्हाधिकारी (रोहयो) (सर्व) यांना माहितीस्तव

(3) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत/नरेगा) जिप (सर्व) यांना माहितीस्तव